१०३

जिल्हा परिषद जळगांव

जिल्हा ग्राम विकास निधीच्या
गुंतवणूकीबाबत.

महाराष्ट्र शासन.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
परिपत्रक क्र. व्हीपीएम २६९९/प्र. क्र. १०७१/२२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक – १८ नोव्हेंबर, १९९२

परिपत्रक :-

मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० मध्ये अशी तरतूद आहे की, स्थायी समितीने वेळोवेळी ग्राम पंचायतींना कर्जे देण्यासाठी किंवा ग्राम पंचायतींनी दिलेल्या अंशदानाच्या रकमावरील व्याज देण्यासाठी तातडतोब आवश्यक नसेल तेवढी रक्कम राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या तारणपत्रामध्ये किंवा याबाबतीत राज्य शासन मान्यता देईल अशा तारणामध्ये गुंतवील्या पाहिजेत आणि तशाच स्वरूपाच्या इतर गुंवणूकीकरिता अशा गुंतवणूकी बदलल्या पाहिजेत आणि तारणपत्रापासून मिळणारे उत्पन्न आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न सदर निधीत परत जमा केले पाहिजे. परंतु महालेखाकार मुंबई यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की काही जिल्ह्यामध्ये ग्राम निधीमधील रक्कम मोठ्या प्रमाणावर मध्ये विना वापर पडलेल्या असून संबंधित जिल्हा परिषदेला याबाबत समाधानकारक खुलासा करता आलेला नाही.

जिल्हा ग्राम विकास निधीमधील रक्कम विनावापर पडून न राहता त्याची योग्य प्रकारे गुंतवणूक होऊन त्यापासून व्याजव्दारे उत्पन्नात वाढ झाल्यास शेवटच्या स्तरावरील पंचायत राज संस्था आर्थिक दृष्टया बळकट होण्यास हातभार लागणार आहे. व यामुळे स्थानिक स्तरावरील आर्थिक व प्रशासकीय समस्या सुटण्यास मदत होणार आहे. म्हणून यापुढे मुंबई ग्राम विकास निधी नियम १९६० मधील निकष लक्षात घेऊन सदर निधीमधील रक्कम विनावापर न ठेवता सदर रकमाची योग्य प्रकारे कशी गुंतवणूक होईल याचा अग्रक्रमाने विचार करावा. व मागील तीन वर्षाचे सरासरी withdrawals च्या दीडपट पेक्षा जास्त रक्कम [current Accounts ] मध्ये राहणार नाही याची सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काळजी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ रा. का. पवार ]
शासनाचे उपसचिव.

ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद, जळगांव.

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त.